ARTHA Poona 4.

उद्योगधंदे, बँकिंग, अर्थशास्त्र, व्यापार, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

" अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : २ आ.
दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 3434. Licence No. 53.

वर्ष २१ | पुणें, बुधवार तारीख ५ डिसेंबर, १९५६ | अंक ४६

## विविध माहिती

**घोड्यांच्या पैदाशीचें केंद्र**—बिहारच्या सरकारनें आपल्या दुसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमांतील एक योजना म्हणून घोड्यांच्या पैदाशीचें केंद्र उघडण्याचें ठरविलें आहे. राज्य सरकारच्या लष्करी पोलिस दलाला व होमगार्ड दलाला लागणारे चांगले घोडे मिळत नसल्यानें ही योजना हातीं घेण्यांत आली आहे. तीसाठी ७० लाख रुपये खर्च येईल.

**खेळाडूंना अधिक मुशाहिरा**—इंग्लंडच्या कसोटी-संघांतून खेळणाऱ्या क्रिकेट खेळाडूंना ह्यापुढें प्रत्येक सामन्याच्या वेळीं १०० पौंड देण्यांत येणार आहेत. स्कोअरर, पंच व राखीव गडी ह्यांनाहि अधिक मुशाहिरा देण्यांत येणार आहे. ऑस्ट्रेलिआ-विरुद्ध खेळण्यांत आलेल्या कसोटी सामन्यांत १९५३ साला-पेक्षा ३०,००० पौंड अधिक उत्पन्न मिळाल्यामुळें हा निर्णय घेण्यांत आला आहे.

**साखरेचे आणखी कारखाने**—म्हैसूर राज्य सरकारला आपल्या दुसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमांत सहकारी तत्त्वावर चालविण्यांत येणारे साखरेचे ५ कारखाने काढण्याची परवानगी देण्यांत आली आहे. प्रत्येक कारखान्यासाठी अंदाजें ६० ते ६५ लाख रुपये भांडवल लागेल. लोकांनीं प्रत्येकी १० लाख रुपयांचें भांडवल जमविल्यावर राज्य-सरकारची व मध्यवर्ती सरकारची मदत मिळणार आहे.

**साखरेच्या उत्पादनांत वाढ**—इंडियन शुगर मिल्स असोसिएशननें जमा केलेल्या माहितीप्रमाणें, १९५५–५६ च्या हंगामांत भारतामधील साखरेच्या कारखान्यांनीं १८,६०,५४५ टन साखर निर्माण केली. मागील सालाच्या हंगामांत साखरेचें उत्पादन १५,८९,७३२ टन झालें होतें. ३१ ऑक्टोबर १९५६, अखेर भारतीय साखरेच्या उत्पादनापैकीं ५,४२,००० टन साखर शिल्लक होती.

**रिझर्व्ह बँकेची इमारत**—कांहीं दिवसांपूर्वी दिल्लीला बसलेल्या भूकंपाच्या धक्क्यामुळें नव्यानें बांधण्यांत आलेल्या रिझर्व्ह बँकेच्या इमारतीला भेगा पडल्या होत्या. पण त्या किरकोळ स्वरूपाच्या असल्याचें समजतें. तथापि, एखाद्या तज्ज्ञ एंजिनिअराकडून सरकार इमारतीची तपासणी करून घेणार आहे.

**अमेरिकेकडे बोटींची मागणी**—कांहीं महिन्यांपूर्वीं भारतानें अमेरिकेकडे १२ ' लिबर्टी ' बोटी विकत देण्याची मागणी केली होती. परंतु त्यावेळीं अमेरिकेच्या अध्यक्षपदाची निवडणूक व्हावयाची असल्यानें जरूर तो कायदा अमेरिकन काँग्रेसला करतां आला नाहीं. आतां भारतानें पुन्हां मागणी केली आहे. बोटी १०,००० टन वजनाच्या असून भारताला त्या सागरी वाहतुकीसाठी पाहिजे आहेत.

**मुलांच्या आरोग्याची तपासणी**—अखिल भारतीय महिला परिषदेच्या सुरत येथील शाखेतर्फे सुरतेमधील ५ वर्षे वयाच्या आंतील मुलांच्या आरोग्याची नमुन्यादाखल तपासणी करण्यांत आली. तपासणींत असें आढळून आलें कीं, फक्त १७ टक्के मुलें पूर्ण निरोगी होती. बाकीच्या सर्व मुलांना कांहींना कांहीं रोगाची बाधा झालेली आढळून आली.

**"युरोपला तेल द्या"**—फ्रान्समधील अमेरिकन चेंबर ऑफ कॉमर्स ह्या संस्थेनें अमेरिकन परराष्ट्रमंत्री मि. डलेस ह्यांना अशी विनंती केली आहे कीं, अमेरिकन कंपन्यांनीं युरोपला ताबडतोब तेल पुरविण्याची व्यवस्था करावी. तेलाचा पुरवठा करण्यापूर्वीं सुएझ भागांतून फौजा काढून घेण्याच्या अमेरिकेच्या अटीमुळें फ्रान्समधील लोक रागावले आहेत. ४०० कंपन्या चेंबरच्या सभासद आहेत.

**कोर्बा येथील कोळशाच्या खाणी**—कोर्बा भागांतील कोळशाच्या खाणींचा विकास करण्यासाठी भारतीय सरकारनें २० कोटी रुपयांची योजना आंखली आहे. खाणींना वापरण्यासाठी ५ कोटी रुपये किंमतीच्या यंत्रसामुग्रीची मागणी परदेशांत लवकरच नोंदण्यांत येणार आहे. ह्या कामीं जरूर ती मदत देण्यासाठी रशिअन तज्ज्ञ भारतांत आले आहेत.

**भारताची पाकिस्तानला मदत**—भारतानें पाकिस्तानला १७,००० टन तांदूळ कर्जाऊ म्हणून दिला होता. तांदुळाचें हें कर्ज पाकिस्तान लवकरच परत करणार आहे. तांदुळाशिवाय इतर ५,००० टन अन्नधान्यहि भारतानें पाकिस्तानला देणगी म्हणून दिलें आहे. सौदी अरबस्थानच्या सरकारलाहि भारतानें १,००० टन अन्नधान्य मदतीदाखल दिलें आहे.

तमाम दंतरोगांवर
★ माकडछाप म्हणजेच काळी टूथ पावडर ★

## लँड मॉर्गेज बँकांपुढील प्रश्न

**सातारा जिल्हा को-ऑपरेटिव्ह लँड मॉर्गेज बँक लिमिटेड, (कराड-सांगली)चे चेअरमन, श्री. कल्याणी, ह्यांचें भाषण**

गेल्या वर्षाच्या पावसाळी अधिवेशनांत कूळकायद्यांत दुरुस्ती होऊन "कसेल त्याची जमीन" हे लवकरच म्हणजे ता. १-४-१९५७ पासून अंमलांत येणार आहे. अर्थात् कुळाचे बाबतींत ही एक उत्कृष्ट प्रकारची संधि आहे. कूळ हक्कानें असलेल्या जमिनींचा तो मालक ठरणार आहे. अर्थात् अगदींच कनिष्ठ स्थिति असलेल्या कुळाकरितां सरकारनें दुरुस्त कायद्यांतच कांहीं तरतूद केलेली आहे. परंतु ज्यांना कांहीं थोडीबहुत जमीन आहे, ज्यांची स्थिति कांहीं अंशीं बऱ्यापैकी आहे पण अर्धवट स्थितींत ज्यांना अशी जमीन खरेदी करतां बँकेकडून कर्ज पाहिजे असेल त्यांना तातडीनें कर्जपुरवठ्याची हमी देत आहे. ज्या जमिनी कूळहक्कानें कुळांच्याच ताब्यांत असतील त्यांनीं ता. १-४-५७ ची वाट न पहातां बँकेकडे करारपत्र जोडून कर्जमागणी अर्ज दाखल करण्यास कांहींच हरकत नाहीं. अर्थात् कुळाची सांपत्तिक स्थिति, वडिलार्जित थोडीबहुत जमीन वगैरे सांगण्याचें कारण येवढेंच कीं बँक आपल्या नियमाप्रमाणें सर्वसाधारणपणें २० रुपये आकाराच्या जमिनीवर ज्यास्तींत ज्यास्त १२०० रुपये कर्ज देऊं शकेल. तेव्हां ही अमूल्य संधि चालून आलेली आहे तरी या संधीचा फायदा घेण्याकरतां सर्व कागदपत्रांसह ३१-१२-५६ चे आंत अर्ज दाखल करावेत. मनुष्यानें हरप्रकारें प्रयत्न केले पाहिजेत. "भाग्यासी काय उणे रे। यत्नावांचुनि राहिले ॥" या समर्थांच्या संदेशाप्रमाणें कूळ अर्जदारांनीं जरूर संधीचा फायदा घ्यावा. अर्थात् प्रत्यक्ष जे शेती करतात त्यांना योग्य त्या कारणांकरतां बँकेच्या नियमाप्रमाणें कर्ज मिळेलच.

गेलीं १०।१२ वर्षे लँड मॉर्गेज बँकेकरतां पूर्वीप्रमाणें एक स्वतंत्र अधिकारी व नोकरवर्ग सरकारकडून मिळावा म्हणून बँकेचे चिकाटीचे प्रयत्न आहेत. यापूर्वी भरलेल्या जनरल सभांनीं दोन तीन वेळां ठराव करून पत्रव्यवहारहि केलेला आहे. १९५० मध्यें भरलेल्या सर्व लँड मॉर्गेज बँकांच्या दुसऱ्या कॉन्फरन्समध्यें हा ठराव होऊन त्याप्रमाणें प्रयत्नहि झाले. १९५२ मध्यें भडोच येथें भरलेल्या मुंबई राज्यांतील पहिल्या प्रायमरी लँड मॉर्गेज बँकांच्या कॉन्फरन्समध्यें देखील असा ठराव झालेला आहे. इतकेंच नव्हे पण रिझर्व बँक ऑफ इंडियाचे अधिकाऱ्यांनीं मुंबई राज्यांतील ७-८ बँकांची तपासणी घेऊन त्यांनींहि पण याच बाबी सरकारचे नजरेस आणलेल्या आहेत परंतु दुर्दैवानें आपलें प्रयत्नांना अद्यापपावेतों यश आलेलें नाहीं. त्यामुळें कामकाजांत एकमेकांत सुसंघटितपणाचा अभाव दिसून येतो, कामकाज तर वाढत नाहींच. वरिष्ठ आणि कनिष्ठ बँकांमध्यें आपुलकीचे संबंध निर्माण होण्यास कठीण जातें. लँड मॉर्गेज बँकेकरतां कायदा होणार असें नुकतेंच आम्हीं ऐकतों. या सर्व गोष्टी साध्य होण्यास एका स्वतंत्र अधिकाऱ्याची नेमणूक होऊन मार्गदर्शन होणें अत्यंत जरूर आहे. हल्लीं औद्योगिक खात्यास, मार्केटिंग, डेअरी, शुगर फॅक्टरी, जॉईन्ट फार्मिंग, लिफ्ट इरिगेशन, वगैरे अनेक खात्यांस स्वतंत्र अधिकारी असून प्रत्येक खात्यावर डेप्युटी रजिस्ट्रार आहे. अल्प मुदतीचे व मध्यम मुदतीचे कर्जांकरतां तर जिल्ह्याजिल्ह्यास असि. रजिस्ट्रार, डिस्ट्रिक्ट को-ऑपरेटिव्ह ऑफिसर, सुपरवायझर, वगैरे अधिकारी आहेत. तेव्हां लांब मुदतीचे कर्जास सुसंबद्धता, मार्गदर्शन, वसूल व झपाट्यानें वाढ होण्यास एक स्वतंत्र अधिकारी नेमणें इष्ट आहे अशी आपण पुन्हां एकदां सरकारांस विनंती करूं या.

## पुढे पाऊल

[ लेखक व प्रकाशक—श्री. श्री. वा. काळे, दुर्गाधिवास पुणें ४, पृष्ठें १३१, किंमत दोन रुपये. ]

पूर्वी इतरत्र प्रसिद्ध झालेले लेख एकत्रित या पुस्तकांत छापले आहेत. 'समाजाच्या ऱ्हासाची हाकाटी' या पहिल्याच लेखांत सामाजिक पापांचीं उदाहरणें लेखकाच्या मार्मिक निरीक्षणाचा प्रत्यय आणून देतात आणि त्यांतील तरुण पिढीला नुसता दोष देऊन भागणार नाहीं हें तत्त्व पटतें. 'रोजच्या जीवनांतील परस्परावलंबन' या लेखनांतील विवेचनावरून 'मजसाठी कुणीच राबत नाहीं' या लहानपणीं वाचलेल्या प्राथमिक पुस्तकांतील गोष्टीची आठवण होते. 'खरी आणि खोटी काटकसर' ही व्यक्तीला, कुटुंबाला, राज्याला व राष्ट्रालाहि उद्‌बोधक होईल अशीच आहे. ज्यानें त्यानें विचार मात्र करावयास पाहिजे. खरा प्रश्न तारतम्य सांभाळण्याचा आहे. पत्नीनेंच पतीशीं सहमत होऊन मिळतें घ्यावें, असा जरासा आपल्याकडील परिस्थितीला न जुळणारा कल ब्रिटिश आणि अमेरिकन मासिकांतील कौटुंबिक जीवनावरील लेखांत दिसून येतो, असे लेखक म्हणतात तें लक्षांत ठेवण्यासारखें आहे. 'कॉलेजांतील मुली आणि त्यांचे आईबाप' आणि 'वरसंशोधनाची आर्थिक मीमांसा', हे लेख पालकांनीं अवश्य वाचण्यासारखे आहेत. पाहुण्यांच्या बाबतींत 'ज्याला आपण शिळी भाकरी किंवा भात मनांत कोणताहि संकोच न धरतां आपल्याबरोबर वाढूं शकतों, तो खरा घरगुती पाहुणा' ही व्याख्या सुंदर आहे. स्त्रिया व पुरुष या दोघांनाहि शर्करावगुंठित गोळ्यांप्रमाणें हे खुसखुशीत लेख उपदेश करतात तो मोलाचा आहे. पुस्तकांत बॉब केसापासून तों वरसंशोधनापर्यंत आणि बॅडमिंटन कोर्टापासून तों पाहुण्यांपर्यंत सर्व विषय रोजच्या अनुभवाच्या आधारावर कौशल्यानें चर्चिले आहेत. या दृष्टीनें देखील विवाहप्रसंगीं भेट देण्यास हें पुस्तक योग्य ठरेल.

२५-११-५६ —"रविवार सकाळ"

गेल्या ता. १७-९-५६ रोजीं राजकोट येथें सेंट्रल को-ऑ. लँड मॉर्गेज बँकेच्या नव्या इमारतीचे उद्‌घाटनप्रसंगीं सौराष्ट्राचे मुख्य मंत्री श्री. रसीकलाल पारेख यांनीं "सौराष्ट्र मुंबई प्रांताला सामील झालें तरी सौराष्ट्र को-ऑ. लँड मॉर्गेज बँकेचें स्वतंत्र अस्तित्व राहील" म्हणून जाहीर केलेले आहे. सभेचे अध्यक्ष श्री. वैकुंठलाल मेहेताजी होते व नव्या इमारतीचें उद्‌घाटन प्रो. कर्वे यांनीं केलेलें आहे. सौराष्ट्र लँड मॉर्गेज बँक स्थापन होऊन ५-६ वर्षेंच झालीं असतील पण इमारत बांधण्याचें सामर्थ्य तिला आलेलें आहे हें पाहून त्या बँकेच्या कामकाजाबाबत मजला अभिमान वाटत आहे व कार्यकर्त्यांचें अभिनंदनहि करणें योग्य होईल. बडोदा जिल्हा को. ऑ. लॅन्ड मॉर्गेज बँक अद्याप मुंबई लॅन्ड मॉर्गेज बँकेस सामील होत नाहीं. यावरून गेलीं २८ वर्षे लांब मुदतीच्या व्यवहाराची चळवळ करूनहि अद्यापहि ही चळवळ मूळ धरत नाहीं; फांदी फुटत नाहीं, झाड वाढत नाहीं, मागाहून आले ते पुढें गेले अशी गत झालेली आहे. आपल्या राज्याची पुनर्घटना होऊन लवकरच आपलें द्विभाषिक राज्य होणार आहे. तेव्हां या संक्रमण काळांत तरी याचा जरूर विचार व्हावयास पाहिजे असें वाटतें. त्याबरोबर आपण दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या उंबरठ्यावर आहोंत. या पंचवार्षिक योजनेंत लांब मुदतीचे कर्जांकरितां २५ कोटी कर्ज भारतांत वाटलें जाणार आहे. तेव्हां आपण या वेळीं स्वस्थ न राहतां जरूर त्या पुढील योजना आखणेचें इष्ट होईल.

# अर्थ

बुधवार, ता. ५ डिसेंबर, १९५६





संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


## बँकिंगच्या कार्याची दिशा व धोरण

देवकरण नानजी बँकिंग कंपनीचे मॅनेजिंग डायरेक्टर श्री. प्रवीणचंद्र व्ही. गांधी ह्यांचें नाशिक येथील रोटरी क्लबापुढें बँकिंगचें कार्य ह्या विषयावर भाषण झालें. ते आपल्या भाषणांत म्हणाले, कीं सध्यां आपल्या देशांत औद्योगिक अर्थपद्धति विकास पावत आहे. अशावेळीं बँकिंगचा विस्तार, त्याची संघटना, आणि एकसूत्रीकरण ह्या तिन्ही बाबतींत आधुनिक धर्तीवर कार्य करण्यास बरीच संधि मिळणार आहे. काळानें टाकलेल्या जबाबदाऱ्या पार पाडण्यास सध्यांची बँकिंगची पद्धत कितपत योग्य आहे ह्याची परीक्षाच होत आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं.

हिंदी बँकांच्या विकासाला अद्याप खूप वाव आहे हें पुढील आंकड्यांवरून दिसून येईल. १९५५ अखेर देशांत ४७४ जॉइंट स्टॉक बँका होत्या व त्यांच्या कचेऱ्यांची संख्या ४,०२७ होती. म्हणजे बँकांशीं व्यवहार करणाऱ्या ११,१२१ माणसांमागें बँकेची एक कचेरी असें प्रमाण पडतें. सर्व देशाचा विचार करतां ७५,००० माणसांमागें एक बँक असें प्रमाण आहे. इंग्लंडमध्यें ४,००० माणसांमागें एक बँक, अमेरिकेंत ७,००० माणसांमागें एक आणि जपानमध्यें १५,००० माणसांमागें एक असें प्रमाण आहे. भारतांत शेड्यूल्ड बँकांच्या कचेऱ्यांपैकी ५० टक्के कचेऱ्या ५०,००० वर लोकवस्ती असलेल्या शहरांतून केंद्रित झालेल्या आहेत. हिंदी जॉइंट स्टॉक बँकांच्या परदेशांतील कचेऱ्यांची संख्या अवघी १०६ आहे. भारतामधील बहुसंख्य जनतेला अजूनहि खाजगी सावकारीसारख्या कर्ज देणाऱ्या संस्थांवर अवलंबून रहावें लागतें. देशाच्या नियुक्त अर्थव्यवस्थेंत बँकिंगला आपलें कार्य करण्यास अजून किती वाव आहे, हें वरील माहितीवरून दिसून येतें. ह्याच हेतूनें स्टेट बँक ऑफ इंडिआची स्थापना करण्यांत आली.

बँकिंगची घटना चिरकाल टिकणारी आणि देशाला उपयुक्त ठरणारी अशी व्हावयाची असेल तर तिचा पाया मजबूत असला पाहिजे, आणि तिची व्यवस्था लोकांचा विश्वास असणाऱ्या व्यक्तींकडे सोंपविण्यांत आली पाहिजे. बँकिंगच्या इमारतीच्या पायास बळकटी आणण्यासाठी शाश्वति, सचोटी, कार्यक्षमता आणि सेवा ह्या चार मुख्य खांबांची आवश्यकता आहे. आपल्या देशाच्या आर्थिक उद्धारासाठी पंचवार्षिक कार्यक्रम आखण्यांत आले आहेत. त्यांच्या यशासाठी बँका महत्त्वाचें कार्य करूं शकतील. कारण, बचतीला उत्तेजन देऊन, ठेवी आकर्षित करून पैशाची गुंतवणूक उत्पादक रीतीनें करण्याचें कार्य त्याच करूं शकतात. पंचवार्षिक कार्यक्रमांत खाजगी भांडवलाला महत्त्वाचें स्थान देण्यांत आलेलें असून व्यापारी बँकांनीं खाजगी उद्योगधंद्यांना मोठ्या प्रमाणावर पैसा पुरवावा अशी अपेक्षा करण्यांत येत आहे. बँकांनीं हें काम समाधानकारक रीतीनें करावयाचें असेल तर त्यांनीं आपली बळकटी व लोकप्रियता वाढविली पाहिजे. असें केल्यानें त्यांच्या जवळील पैशाची वाढ होईल. सध्यां ह्या बाबतींत बँकर्सची मनःस्थिति थोडीशी बावचळलेली आहे. कारण, देशांतील व्यवहारांत असलेल्या एकूण चलनाच्या मानानें बँकांजवळील ठेवींची वाढ फार हळु होत आहे. ह्या बाबतींत असा तर्क करण्यांत येत आहे कीं, नव्यानें काढण्यांत येणाऱ्या जादा चलनांपैकी बरेंच चलन अशा लोकांच्या हातीं जात आहे कीं ज्यांना बँकांचा उपयोग करण्याची अगर पैशाची बचत करण्याची संवय नाहीं. म्हणून नव्या चलनानें जी खरेदीची शक्ति निर्माण केली आहे तीपैकी बराच मोठा भाग बँकांच्या मार्फत व्यवहारांत आणण्यासाठी सर्व उपाय योजण्यांत यावेत.

आपल्या बँकांमधील पैशाचा सांठा वाढविण्यास अद्याप पुष्कळ वाव आहे. हिंदी शेड्यूल्ड बँकांमधील ठेवी एकूण चलनाच्या अवघ्या तीनचतुर्थांश इतक्याच आहेत. इंग्लंडमधील बँकांच्या ठेवी त्या देशांतील चलनाच्या तिप्पट आहेत. आपल्या लोकांत–विशेषतः खेड्यांतील लोकांत–बँकांच्या कार्याबद्दल प्रचार करण्यांत आला पाहिजे. देशाच्या औद्योगिक व इतर योजनांसाठी पैशाचा उपयोग व्हावा म्हणून तो रिकामा न ठेवतां बँकांच्या मार्फत त्याकारणीं लावला गेला पाहिजे. ह्याविषयीं लोकांना शिक्षण देण्यांत आलें पाहिजे. उलट बँकांनींहि लोकांशीं करण्यांत येणारे व्यवहार अधिक सुलभ आणि जरूर तेथें स्थानिक भाषेंत करण्याचे मार्ग शोधून काढले पाहिजेत. असें केल्यानें बँकांत खातीं उघडण्यासंबंधीं त्यांना आकर्षण वाटेल आणि रोखीनें व्यवहार करण्याऐवजीं चेक्सच्या साह्यानें तें करण्याची प्रवृत्ति वाढेल. शेड्यूल्ड बँका ह्या रिझर्व्ह बँकेच्या नियंत्रणाखालीं असतात. ज्या बँकेला परवाना देण्यांत आलेला आहे अशी बँक अयशस्वी होणार नाहीं, ह्याविषयीं दक्षता घेऊन रिझर्व्ह बँकेला शेड्यूल्ड बँकांवरील लोकांचा विश्वास वाढीस लावतां येईल. भारतामधील बँकांना देशांत होणाऱ्या बदलाची दखल तर घेतलीच पाहिजे, पण अमेरिका व इंग्लंडसारख्या देशांतील झपाट्यानें होणाऱ्या बदलाकडेहि त्यांनीं लक्ष दिलें पाहिजे; कारण ह्या देशांतील बँकिंगची पद्धत तेथील उन्नत औद्योगिक अर्थव्यवस्थेच्या गरजांशीं व परिस्थितीशीं निगडित झालेली आहे.

अलीकडे बँका ह्या विक्रीच्या व्यवहाराविषयीं अधिक जाणीव ठेवतात. कर्ज मागणारा छोटा असो अगर मोठा असो त्याच्याविषयीं बँकांनीं आपली वृत्ति बदललेली आहे. उद्योगधंद्यांच्या बदलत्या गरजा लक्षांत घेऊन 'कर्ज' ह्या संज्ञेचा अर्थ बँकांनीं अधिक लवचिक केला आहे. निरनिराळ्या उद्योगधंद्यांच्या तांत्रिक गुंतागुंतीची पूर्ण माहिती करून घेण्यास त्यांनीं प्रारंभ केला आहे. कर्जे देण्याच्या आपल्या धोरणांत त्या नवीन प्रथा पाडूं लागल्या आहेत. 'उत्पादनासाठी कर्ज' देण्याची पद्धत ही अशीच एक नवी प्रथा आहे. गिऱ्हाइकांच्या वाढत्या गरजा पुरविण्यासाठी त्यांनीं नवीन तंत्र उपयोगांत आणण्यास सुरवात केली आहे. मोठ्या रकमांचीं थोडीं खातीं असण्यापेक्षा लहान

रकमांचीं अधिक खातीं वाढविण्याकडे त्यांची प्रवृत्ति होऊं लागली आहे. अशा धोरणानें मध्यम प्रतीचें उत्पन्न असणाऱ्या लोकांशीं बँकांचा अधिक संबंध येतो. ही गोष्ट युगमान लक्षांत घेतां योग्य अशीच म्हटली पाहिजे. बँकांनीं आपली विचारसरणी अधिक उदार केली पाहिजे. व्यवहार करण्याच्या परंपरागत व साचेबंद पद्धति बंद केल्या पाहिजेत, आणि अधिक लवचिक, साह्यकारक आणि क्रियाशील धोरणाचा स्वीकार केला पाहिजे. सरकारनें देशाच्या विकासाच्या अनेक योजना आंखल्या आहेत व त्या अंमलांत आणण्यासाठी उपायहि करण्यांत येत आहेत. बँकांनीं आपली वृत्ति आणि कृति ह्या दोन्ही सरकारच्या कार्यक्रमाशीं अधिक सुसंगत आणि जुळत्या होतील अशी दक्षता घेतली पाहिजे.

बँकिंगच्या व्याख्या अनेक प्रकारच्या करण्यांत आलेल्या आहेत. आज ह्या व्यवसायाच्या सेवेच्या अंगाकडे अधिक लक्ष वेधण्यांत येत आहे, आणि तें बरोबरहि आहे. बँकिंग ही सार्वजनिक उपयुक्ततेची सेवा करणारी संस्था आहे, कारण ती समाजाची व देशाची सेवा करते असा श्री. नानजी ह्यांनीं समारोप केला.

## सोळा कोटी रु. ची करवाढ : हुंडणावळीची बचत

शुक्रवार दि. ३० नोव्हेंबर रोजीं लोकसभेंत अर्थमंत्री, श्री. कृष्णम्माचारी, ह्यांनीं अनपेक्षितपणें १६ कोटी रु. ची करवाढ जाहीर केली. ती करतांना ते म्हणाले:—

रिझर्व्ह बँकेजवळ परदेशी हुंडणावळीचे जे राखीव निधि होते, त्यांत मार्च १९५६ पासून घट होऊं लागली. आतांपर्यंत सुमारें २०० कोटींपेक्षाहि जास्त घट झालेली आहे. ही रक्कम विकासकार्याच्या निमित्तानें खर्च झाली ही गोष्ट खरी असली तरी ज्या वेगानें ही घट झाली तो वेग मर्यादित केला पाहिजे. आपली परदेशी हुंडणावळ काटकसरीनें वापरण्याशिवाय गत्यंतरच उरलेलें नाहीं.

### आयातीवर नियंत्रण

यापुढील काळांत जागतिक घडामोडींकडे जागृतपणें पाहणें आवश्यक झालें आहे. खूपच आशावादित्वानें पाहिलें तरी सहा महिने सुवेझ कालवा खुला होत नाहीं हें आपण धरून चाललेंच पाहिजे. पंचवार्षिक योजनेच्या अंमलबजावणींत हा मोठा अडथळा आहे. पंचवार्षिक योजनेच्या अंमलबजावणीसाठी आपला आर्थिक पाया खूपच मजबूत केला पाहिजे. ४८०० कोटी रुपयांपेक्षा अधिक ५०० कोटी रुपये तरी योजनेसाठी लागतील असें गृहीत धरलेंच होतें. पण चलनवाढीमुळें राज्य व केंद्र-सरकारांच्या विकास–योजनांच्या अर्थसंकल्पांतच ४०० कोटी रुपयांची तूट पहिल्या वर्षीं पडलेली आहे. अशा स्थितींत परदेशांतून माल आणण्यांत क्रोडो रुपये नासणें शक्य नाहीं म्हणून आयातीवर नियंत्रण बसविणें भाग पडलें आहे. परदेशांची मदत मिळवावयाची म्हटली तरीसुद्धां घरचें अर्थकारण सुधारलें पाहिजे.

भांडवली नफ्यावर बसविण्यांत आलेल्या कराची आकारणी एप्रिल १९५६ पासूनच्या मुद्तीची होणार आहे. सध्यां १५००० रुपये ही करपात्र भांडवली नफ्याची किमान मर्यादा आहे, ती आतां ५००० रुपये करण्यांत आली आहे. मात्र प्राप्तीच्या दृष्टीनें खालच्या पायरीवर असलेल्या नागरिकांच्या बाबतींत ही किमान मर्यादा १० हजार रुपये राहील. लहानसहान घरांच्या विक्रींतून होणाऱ्या प्राप्तीवरील भांडवली करांत कांहीं सूटहि दिली जाईल. भांडवली नफ्यावरील कराच्या दरांची नवी श्रेणीहि प्रकट करण्यांत आली आहे.

### डिव्हिडंडवर करवाढ

ज्या कंपन्या वसूल भांडवलाच्या ६ टक्क्यांहून अधिक लाभांश ( डिव्हिडंड ) देतात, त्यांच्यावरील सुपरटॅक्सचा दर वाढविण्यांत येत आहे. ६ ते १० टक्के देणारांना रुपयामागें दोन आणे, १० ते १८ टक्के देणारांना रुपयामागें चार आणे व १८ पेक्षा अधिक देणारांना रुपयामागें ६ आणे असा हा कर द्यावा लागेल. कंपन्यांचे घसारा इत्यादि जे राखीव निधि असतात त्यांवर अधिक नियंत्रण आणण्याच्या दृष्टीनें कांहीं तरतुदी करण्यांत आल्या आहेत.

ज्या कंपन्या ह्या विविध राखीव निधींपैकी कांहीं भाग सरकारकडे किंवा रिझर्व्ह बँकेंत गुंतवत नाहींत, त्यांच्या नफ्याचा हिशेब करतांना हे निधि नफ्यांत धरले जातील. किती रक्कम गुंतवावयाची त्याचे विविध नियमहि ठरवले आहेत. डिव्हिडंड म्हणून ६० टक्के नफा वांटला पाहिजे असें जें बंधन आहे ते ५० टक्क्यांपर्यंत आणण्यांत आलें आहे. कंपनीच्या विकासाला नफ्यांतून अधिक रक्कम मिळावी म्हणून ही सवलत देण्यांत आली आहे.

### आयात करांत वाढ

याशिवाय अनेक प्रकारच्या वस्तूंवरील आयात करांत वाढ करण्यांत आली आहे. त्यांत दारू व स्पिरिटवरील जकात २५ च्या ऐवजीं ५० टक्के करण्यांत आली आहे. यामुळें ७० लाख रुपये अधिक उत्पन्न होईल. मोटार-सायकली, स्कूटर्स व घड्याळें यांच्यावरील आयात जकात वाढल्यामुळेंहि ५० लाख रुपये अधिक वसुली होईल. कांहीं प्रकारचे रंग व कांहीं यंत्रांवरील करहि वाढविण्यांत आला आहे. कृत्रिम रेशमावरील आयात कर वाढविल्यामुळें सरकारला १,६० लक्ष रुपये जादा मिळतील. मोटारींवरील करवाढींतून ट्रक्स व लहान गाड्या सुटलेल्या आहेत.

हुंडीवरील स्टॅम्पड्यूटींतहि वाढ करण्यांत आली आहे.

---

**पार्लमेंटच्या सभासदांना फुकट विमान-प्रवास—** पार्लमेंटच्या सभासदांना सध्यां आगगाडीनें फुकट प्रवास करतां येतो, तो विमानानेंहि करतां यावा, अशी तरतूद करणारें एक बिन-सरकारी बिल पार्लमेंटांत मांडण्यांत आलें आहे.

**मुलांसाठी चित्रपट—** रशिआंत मुलांसाठी तयार केलेले चित्रपट भारतांत दाखविण्यासाठी देण्यास रशिआनें तयारी दाखविली आहे. राजकोट येथें साजरा झालेल्या बालदिनाच्या दिवशीं कांहीं रशिअन चित्रपट मुलांना दाखविण्यांत आले.

**मध्यवर्ती सरकारकडे कर्जाची मागणी ?—** नव्या मध्यप्रदेशाची राजधानी म्हणून भोपाळला मान्यता मिळाली. परंतु भोपाळ येथें कचेऱ्यांसाठी लागणाऱ्या जागांची व रहात्या घरांची टंचाई जाणवत आहे. राज्याच्या अर्थसंकल्पांत घरबांधणीसंबंधीं तरतूद केलेली नसल्यामुळें राज्यसरकार मध्यवर्ती सरकारकडे कर्ज मागण्याचा संभव आहे.

**रशिआची तेल पुरविण्याची तयारी—** सुएझ कालव्याच्या मार्गानें येणारें तेल बंद झाल्यामुळें पश्चिम युरोपांतील राष्ट्रांवर तेलाचें वाटप करण्याचा प्रसंग आला आहे. पश्चिम युरोपांतील फ्रान्स व इतर राष्ट्रांना तेल पुरविण्याची तयारी रशिआनें दाखविल्याची वार्ता आहे. त्याचप्रमाणें पश्चिम आशिआंतील इजिप्त, सीरीयासारख्या राष्ट्रांनाहि तेल पुरविण्यास रशिआ तयार आहे.

## गुजरातमधील प्रमुख सहकारी संस्था

### ( लेखांक दुसरा )

लेखक : श्री. ल. का. कुलकर्णी, बी. ए.

C/o कोऑपरेटिव्ह ट्रेनिंग कॉलेज, पुणें १.

### ३. दक्षिण गुजरात सहकारी मार्केटिंग युनियन लि. सुरत

इ. स. १९१९ च्या मंदीच्या काळांत शेतकऱ्यांना व्यक्तिगत कापसाची विक्री करणें त्रासदायक वाटूं लागलें. श्रमाचा मोबदला त्यांना पुरेसा मिळेना. अशावेळीं कांहीं उत्साही शेतकरी एकत्र आले व त्यांनीं श्री. पुरुषोत्तमभाई पटेल यांच्या नेतृत्वाखालीं १३ सभासदांची एक सोसायटी स्थापन केली. सोन्सक ग्रुप सहकारी कॉटन सेल सोसायटी लि. हें सोसायटीचें नांव असून आज ही सोसायटी एक भरभराटीस आलेली व अत्यंत कार्यक्षम अशी म्हणून गणली जात आहे. सहकाराचें महत्त्व त्या भागांतील लोकांना पटल्यानंतर अशा प्रकारच्या सोसायटया भराभर स्थापन होऊं लागल्या.

सहकारी जिनिंग व प्रेसिंग फॅक्टरीमार्फतच कापसाच्या गांठी बनविल्या जातात व नंतर विक्रीसाठीं पाठविल्या जातात. कापसाच्या अनेक जाती असतात. प्रत्येक जातीचा कापूस अर्थातच वेगवेगळया दरानें विकला जातो. तथापि हंगाम संपल्यानंतर सभासदांना सरासरी किंमत दिली जाते, हें विशेष लक्षांत घेण्यासारखें आहे.

कॉटन सेल सोसायटया पीक उभारण्यासाठीं शेतकऱ्यांना अगाऊ रकमा देतात. कापसाच्या लागवडीचें क्षेत्र ठरवून सुमारें एकरीं रु. ३० याप्रमाणें रक्कम मिळते. तसेंच सोसायटीच्या ताब्यांत कापूस विक्रीसाठीं आल्यानंतर तावडतोब विक्री झाली नाहीं तर शेतकऱ्यांना त्यांच्या मालावर ७५ टक्के रक्कम कर्जाऊ वांटली जाते. व्याजाचा दर ६॥ टक्के आहे.

सन १९२१ ते २६ च्या काळांत खाजगी जिनिंग व प्रेसिंग फॅक्टरींनीं या सहकारी सोसायटयांना खूप त्रास दिला, कार्यांत अनेक अडथळे निर्माण केले पण शेतकरी डगमगले नाहींत. १९२६ सालीं त्यांनीं स्वतःचीच एक सहकारी जिनिंग फॅक्टरी सुरू केली. आज अशा प्रकारच्या १२ सहकारी सोसायटया आहेत.

सहकारी कॉटन सेल सोसायटी व व्यक्तिगत शेतकरी यांना या सहकारी फॅक्टरीचे सभासद होता येतें. आर्थिक दृष्टया सर्व सोसायटया मजबूत आहेत.

सहकारी कॉटन सोसायटयांना कापूसविक्रीबाबत, खाजगी व्यापाऱ्याकडून अडथळे येत होते. शिवाय घाऊक व्यापाऱ्याबरोबर किंवा कॉटन मार्केटबरोबर त्यांचा संबंध येत नव्हता. म्हणून त्यांनीं सर्व सहकारी कॉटन सोसायटयांचा मिळून एक संघ स्थापन केला. १९२६ सालीं या संघानें आपलें कार्य सुरू केलें. परंतु १९३० सालीं हा संघ रजिस्टर केला गेला. सध्यां ४६ कॉटन सेल सोसायटया व ६ प्रेसिंग व जिनिंग फॅक्टरी या संघाचे ( युनियन ) सभासद आहेत.

या संघाचें मुख्य कार्य म्हणजे सहकारी सोसायटयांनीं आणलेल्या कापसाचा भाव ठरविणें हें होय. भाव ठरविल्यानंतर मालाची प्रत्यक्ष देवाण-घेवाण सोसायटी व खरेदी करणार परस्पर करतात. मुंबईतील घाऊक व्यापाऱ्यांशीं संबंध जोडणें. शेतकऱ्यांची फसवणूक न होतां त्यांना किफायतशीर किंमत मिळवून देणें व त्यांच्या मालाबद्दल त्यांना जास्तींत जास्त मोबदला मिळवून देणें हीं कामें हा संघ करतो. सभासद-सोसायटयांना कर्जपुरवठा हा संघ करीत नाहीं. कारण, बहुतेक सोसायटया स्वावलंबी आहेत.

मुंबईच्या बाजारपेठेशीं सतत संबंध रहावा म्हणून या संघानें आपली एक शाखा मुंबईला सुरू केली आहे.

हंगाम संपल्यानंतर या संघाचा नोकरवर्ग सभासद-सोसायटयांची अंतर्गत हिशेबतपासणी करतो.

संघाचें आणखी एक वैशिष्टय म्हणजे या संघाच्या कक्षेंतील व सभासद-सोसायटींच्या ताब्यांतील सर्व कापसाचा विमा एकाच सहकारी विमा कंपनीमार्फत उतरला जातो. ती विमा कंपनी म्हणजे 'ऑल इंडिया को-ऑपरेटिव्ह फायर ॲण्ड जनरल इन्शुरन्स कं. लि. मुंबई'. या विमा कंपनीचें कमिशन अर्थात् संघाला मिळतें. कापूस खरेदी-विक्रीबाबत शेतकऱ्यांच्या अडचणी व सरकारचें धोरण यांची सांगड घालून देण्याचें कार्य हा संघ वेळोवेळीं करतो.

या संघाची प्रगति खालील आंकड्यांवरून दिसून येईल.

| वर्ष | संघाचे सभासद | | वर्षांतील एकूण उत्पन्न (गांठी) | संघामार्फत विक्री (गांठी) | शेंकडा प्रमाण |
|---|---|---|---|---|---|
| | सोसायटया | व्यक्तिगत सभासद | | | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १९३१ | ११ | २७३१ | १,६६,३०० | ८,२२३ | ५·० |
| १९४१ | २५ | ६५२६ | १,५५,२८५ | १६,७८१ | १०·८ |
| १९५१ | ४३ | १३४८१ | १,२०,००० | २८,६८७ | २३·९ |
| १९५५ | ४३ | २१७९२ | २,०८,५५२ | ६९,७७१ | ३३·० |
| १९५६ | ५२ | २५००० | २,५३,००० | १,०५,००० | ४१·५ |

याशिवाय कांहीं या संघाशीं संलग्न नसणाऱ्या सहकारी कॉटन सेल सोसायटया जमेस धरल्या तर या संघाच्या कक्षेंतील निर्माण होणाऱ्या कापूस गांठींपैकीं सुमारें ५० टक्के गांठींची विक्री सहकारी संस्थांमार्फत होते हें लक्षांत घेण्याजोगें आहे.

### ४. अमरोली ग्रुप सहकारी विविध कार्यकारी सोसायटी लि.

मु. पो. अमरोली स्टेशन-उतराण ( वे. रेल्वे )

या सोसायटीची स्थापना १४-५-४७ रोजीं झाली. सुरवातीस रेशनमध्यें मिळणाऱ्या वस्तूंची विक्री ही सोसायटी करीत होती. आसपासच्या पांच मैलांच्या टापूंतील खेडीं सोसायटीच्या कक्षेंत येतात. या भागांतील प्रमुख पिकें कापूस, ज्वारी, तंबाखू व केळीं हीं होत. यांची खरेदी-विक्री या सोसायटीमार्फत होत असते. सुरवातीस सभासदसंख्या ९९ होती. आज ४७१ आहे.

सोसायटीचें अधिकृत भांडवल रु. ५०,०००/- असून खपलेलें भांडवल रु. १५,०७०/- आहे. एका शेअरची किंमत रु. १०/- ठेवण्यांत आली आहे.

सध्यां सोसायटीच्या दुकानांतून किराणा सामान, धान्यें, कापड, क्रूडऑईल, रॉकेल, मिश्रखतें इ. ची विक्री होते.

या भागांत केळीचें उत्पन्न भरपूर असल्यामुळें त्यांची विक्री या सोसायटीमार्फत होते. गेल्या वर्षी सुमारें दीड लाख रु. चीं

केळीं विकण्यांत आलीं. या परिसरांतील १४५० एकरांत केळींची लागवड करण्यांत आली आहे.

सोसायटीनें एक ट्रॅक्टर खरेदी केला असून सभासदांना तो नांगरणीसाठी भाड्यानें मिळतो. ट्रॅक्टरची किंमत रु. २९०००/- असून तेवढी कमाई त्यानें सोसायटीला आतांपर्यंत मिळवून दिली आहे.

सोसायटी आपल्या सभासदांना रु. ३००/- पासून रु. १०००/- पर्यंत कर्जाऊ रकमा देते. याशिवाय किरकोळ खर्चासाठीं रु. ४०/- पासून रु. २००/- पर्यंत बिनव्याजी दोन महिन्यांचे मुदतीनें मिळतात. अर्थात् ही रक्कम अनपेक्षित घरगुती अडचण अगर आजार निर्माण झाला तर सभासदांची कुचंबणा होऊं नये म्हणून सोसायटी बिनव्याजी रक्कम पुरवितें, हें या सोसायटीचें वैशिष्ट्य. १९५३ सालापासून सोसायटीनें 'स्मॉल सेव्हिंग्ज स्कीम' ची योजना सुरू केली आहे. व्याजाचा दर २½ टक्के ठेवण्यांत आला आहे.

सोसायटीनें धान्य वगैरे सांठविण्यासाठी रु. २८,९५० खर्चून एक गुदाम बांधलें आहे. या रकमेपैकी रु. १०,०००/- भारत सेवक समाजानें देणगीदाखल दिले आहेत.

सोसायटी गेलीं ८ वर्षे 'अ' वर्गांत आहे. सुरत जिल्ह्यांतील एक नमुनेदार प्रगतीशील सोसायटी म्हणून सोसायटीची सुरत डि. सें. बँकेनें प्रशंसा करून रा. ब. खंडूभाई देसाई ॲवार्ड बहाल केलें आहे.

### कोलारच्या सोन्याच्या खाणींचें राष्ट्रीयीकरण

कोलारच्या दरसाल २ लक्ष औंस सोनें उत्पादन करणाऱ्या ब्रिटिश खाणी कंपनींचें म्हैसूर सरकारनें राष्ट्रीयीकरण केलें असून २९ नोव्हेंबर १९५६ पासून त्या खाणी म्हैसूर सरकारच्या मालकीच्या झाल्या आहेत. कम्युनिस्ट देश सोडले तर इतर दुसऱ्या कोठेंहि सोन्याच्या खाणी सरकारी मालकीच्या व सरकारी व्यवस्थेखालीं नाहींत. सोन्याच्या शोधार्थ कोलारच्या खाणी खोदतांना कितीतरी कंपन्या नुकसानींत आल्या व खोदकाम सोडून देण्याचा विचार चालू असतांनाच सुप्रसिद्ध 'चँपिअन लोड' चा शोध लागला. तेव्हांपासून खाणींतून शास्त्रशुद्ध पद्धतीनें सोनें काढण्यांत येत आहे. जगांतील सर्वांत जास्त खोल म्हणजे जमिनीखालीं ९,९५० फुटांतील सोनें काढण्याचा विक्रम तेथें चालू आहे. खाणीच्या ब्रिटिश कंपन्यांनीं उत्पादन सतत सारखें चालू ठेवलें आहे, त्यांत सालोसाल घट-वाढ होऊं दिली नाहीं; मजुरांनाहि नीट वागवलें, म्हैसूर सरकारलाहि प्राप्ति बरी झाली. तथापि, ह्या खाणींपासून ज्यास्त प्राप्ति व्हावी, ह्या हेतूनें म्हैसूर सरकारनें त्यांची मालकी स्वतःकडे घेण्याचें ठरविलें. म्हैसूर सरकारनें पूर्वीच्या व्यवस्थापकांचेंच धोरण चालू ठेवणें इष्ट होईल; ज्यास्त सोनें खणून काढण्याची घाई केली, तर सोनें संपुष्टांत येऊन खाणीवर अवलंबून असणारांचे (खाणींत २४,००० मजूर काम करतात) उदरनिर्वाहाचें साधनच नाहींसें होईल. कंपन्यांनीं मागितलेल्या नुकसानभरपाईपेक्षा फारच कमी नुकसानभरपाई त्यांना मिळालेली आहे.

### रेल्वे अपघातामुळें चोरांनीं संधि साधली

अरियालूर येथें नुकत्याच झालेल्या रेल्वे-अपघातांतील दुर्दैवी माणसांचे अंगावरील सोन्याचे दागिने, कपडे, पैसे, इत्यादि चोरल्याबद्दल ६२ लोकांना मुद्देमालासकट अटक करण्यांत आली आहे. हे सर्व आजूबाजूच्या गांवांतील रहिवासी आहेत.

### बॉंबे स्टेट को. बँक्स असोसिएशन लि.

वरील संस्थेच्या पटावर ३० सप्टेंबर, १९५६ अखेर १२६ बँका होत्या. त्यांपैकी २९ मध्यवर्ती बँका व ९७ अर्बन बँका होत्या. सहकारी बँका व बँकिंग ह्यासंबंधींच्या धोरणावर मत व्यक्त करणें व विचारलेल्या बाबतींत सल्ला देऊन मार्गदर्शन करणें, हीं कामें असोसिएशननें पूर्वीप्रमाणें अहवालाचे वर्षीहि केलीं. जरूर तेव्हां असोसिएशननें स्वतः पुढाकार घेऊन सरकारी निर्णयाबाबत जरूरीप्रमाणें योग्य ते मुद्दे पुढें मांडले. बिल कलेक्शन व सभासद बँकांवर ड्राफ्ट देणें ह्यासंबंधांतील 'म्युच्युअल अरेंजमेंट स्कीम' समाधानकारक चालू आहे. अहवालाचे वर्षी ह्या योजनेप्रमाणें २३ मध्यवर्ती व ७१ अर्बन बँकांनीं मिळून ५३·२० लक्ष रुपयांचे १०,२६४ ड्राफ्ट व चेक्स काढले. ३८१ ठिकाणच्या पैशाच्या वर्गावर्गीची सोय त्यामुळें झाली. 'को-ऑपरेटिव्ह बँकिंग' हें असोसिएशनचें त्रैमासिक सहकारी क्रेडिट चळवळीविषयीं माहिती देण्याचें कार्य चांगल्या तऱ्हेनें करीत आहे. श्री. आर. जी. सरय्या हे असोसिएशनच्या एक्झिक्युटिव्ह कमिटीचे चेअरमन असून श्री. बा. पुं. वर्दे हे ऑनररी सेक्रेटरी आहेत.

### टेलिफोन तारांच्या चोऱ्या

टेलिफोनच्या तारा तोडून त्या चोरून नेण्याची प्रवृत्ति वाढत आहे. १९५५-५६ मध्यें अशा ४,००० चोऱ्या झाल्या; १९५१-५२ मध्यें २,००० चोऱ्या झाल्या होत्या. चोरीस गेलेल्या तारांच्या किंमतीचें तर नुकसान होतेंच, पण त्याबरोबर ट्रंक टेलिफोनच्या वहातुकींत व्यत्यय येतो. १९५०-५१ मध्यें भारतांत एकूण ८० लक्ष ट्रंक कॉल करण्यांत आले. १९५५-५६ मध्यें त्यांची संख्या २½ कोटींवर गेली. भारतांतील टेलिफोन तारांच्या चोऱ्यांपैकी ६०% चोऱ्या दिल्ली-कलकत्ता मार्गावर होतात. तेथील तारा तोडून चोरल्या गेल्या, म्हणजे दिल्ली व कलकत्ता ह्यामधील टेलिफोनचें दळणवळण मुंबई-मार्गें करावें लागतें. त्यामुळें, दिल्ली-मुंबई व मुंबई-कलकत्ता ह्यांचेमधील तारांवर ताण पडून कॉल्स मिळण्यास विलंब लागतो. टेलिफोनच्या तारा चोरीस जाऊं नयेत ह्यासाठी राज्य सरकारांनीं पोलिसांचा पहारा वाढवावा, अशी तारखात्यानें त्यांना विनंती केली आहे.

### भारताच्या स्टर्लिंग शिलका

भारताच्या इंग्लंडमधील शिलका शीघ्र गतीनें कमी होत असल्याबद्दल कांहींशी चिंता व्यक्त करण्यांत येत आहे. १९४८ मध्यें ह्या शिलकांच्या फेडीबद्दल इंग्लंड व भारत ह्यांच्यामध्यें करार झाला, त्यानंतर १९५१ च्या जुलैंत ह्या शिलकांनीं उच्चांक गांठला. (८५७·४१ कोटी रुपये) १९५६ च्या जुलैमध्यें ही शिलक ६५३·४७ कोटी रुपये एवढ्यावर आली. गेल्या कांहीं महिन्यांतील घट पूर्वीचे मानानें ज्यास्त असली, तरी तूर्त तरी विशेष काळजीचें कारण नाहीं. पहिल्या पंचवार्षिक योजनेच्या पांच वर्षांत स्टर्लिंग शिलका २९० कोटी रुपयांनीं कमी होतील, अशी अपेक्षा होती. परंतु फक्त १४० कोटी रुपयांचीच घट झाली. एप्रिल, १९५६ ते ऑक्टोबर, १९५६ अखेरचे स्टर्लिंग शिलकांचे आंकडे खालीं दिले आहेत :—

| १९५६ | (कोटी रुपये) |
|---|---|
| एप्रिल | ७२६ |
| मे | ७०५ |
| जून | ६८२ |
| जुलै | ६५३ |
| ऑगस्ट | ६३२ |
| सप्टेंबर | ६१५ |
| ऑक्टोबर | ५९१ |

## मुंबई कूळकायद्यांतील ५० एकरांची मर्यादा

### ( मुंबई रेव्हिन्यु ट्रिब्युनल, तपासणी–अर्ज )

प्रस्तुत अर्जातील प्रतिपक्ष जमीनदार असून अर्जदार कुळें आहेत. जमिनदाराला स्वतःच्या वहितीकरितां शेत पाहिजे म्हणून मामलेदाराकडे त्यानें कबजाचा अर्ज केला होता. मामलेदारानें जमिनदाराचा अर्ज नामंजूर केला होता. त्याविरुद्ध केलेलें अपील प्रांताधिकाऱ्यानें मंजूर केलें परंतु जमिनदारानें मागितलेल्या सबंध शेताचा कबजा न देतां कांहीं एकर कबजांत देण्याचा हुकूम केला. या आदेशाविरुद्ध कुळांनीं हा तपासणी अर्ज केला आहे.

२. टेनन्सी केस नं. ४६।१९५२ ही प्रतिपक्षानें मंगलवाडी येथील शेत स. नं. ११८ चा कबजा मिळण्याकरितां जमिनदारानें केलेल्या अर्जातून उत्पन्न झाली आहे. कूळ वहिवाट नष्ट करण्याची नोटीस जमिनदारानें कुळाला ता. २३–३–१९५२ रोजीं दिली होती. मामलेदारानें असें ठरविलें कीं, जी जमीन जमिनदारानें मागितली होती तीच त्याच्या उपजीविकेचें मुख्य साधन होतें. परंतु जमिनदाराच्या कबज्यांत ५० एकरांपेक्षा जास्त जमिन होती म्हणून मामलेदारानें जमिनदाराचा अर्ज काढून टाकला. त्याविरुद्ध जमिनदारानें अपील केलें. प्रांताधिकाऱ्यानेंहि असें ठरविलें कीं, जमिनदारानें मागणी केलेली जमीनच त्याच्या उपजीविकेचें मुख्य साधन आहे. प्रांताधिकाऱ्यानें असेंहि ठरविलें कीं, जमीनदार व त्याचा मुलगा यांच्यामध्यें झालेली वाटणी पोकळ नसून खरीच आहे. मामलेदारानें वांटणी पोकळ ठरविली होती तें बरोबर नाहीं. जमीनदार फक्त १६ एकर जमीन वहीत करीत होता. तेव्हां वादांतील जमिनीचा कबजा मागण्याचा त्याला हक्क होता म्हणून मामलेदाराचा आदेश रद्द करून प्रांताधिकाऱ्यानें जमिनदाराचें अपील मंजूर केलें. त्याविरुद्ध कुळांनीं हा तपासणी–अर्ज केला आहे. प्रांताधिकाऱ्यानें कलम ३४ पोटकलम (२–अ) चा आधार घेऊन असें ठरविलें कीं, प्रतिपक्ष–जमिनदाराजवळ 'शेती–क्षेत्रा' पेक्षा जास्त जमिन असल्यामुळें त्याला फक्त निम्मीच जमीन मिळेल म्हणून जमिनदारानें त्या आदेशाविरुद्ध अर्ज केला आहे.

३. या दोन्ही अर्जांची सुनावणी एकदमच करण्यांत आली. आमच्यापुढें मुख्य प्रश्न हा आहे कीं, प्रांताधिकाऱ्यानें जमनिदार ५० एकर किंवा जास्त जमीन वहीत करीत होता असें मत व्यक्त केलें तें बरोबर आहे काय? मामलेदारानें वांटणी पोकळ ठरविली तें बरोबर आहे कीं नाहीं याचा विचार करण्याची जरूर नाहीं. कलम ३४ पोटकलम (१) च्या अपवादांत खाली विचार करावयाचा मुख्य प्रश्न हा आहे कीं, ज्या जमिनदारानें कबजाचा अर्ज केला त्याच्यापाशीं नोटिशीच्या तारखेस ५० एकरांपेक्षा जास्त जमीन होती काय? कनिष्ट कोर्टाच्या मताप्रमाणें नोटिशीच्या तारखेस जमीनदाराच्या स्वतःच्या वहितींत फक्त ३२ एकर १२ गुंठे जमीन होती. यशिवाय तो व त्याच्या भावाच्या जोड वहितीस ११ एकर जमीन होती. अर्जदार कुळांची तक्रार अशी आहे कीं, जमीनदाराची व त्याच्या जोड वहितींत जी ११ एकर २९ गुंठे जमीन आहे ती बागाईत जमीन आहे. तेव्हां त्याच्या जोड वहितींत ४६ एकरांपेक्षा जास्त जमीन आहे असें समजलें पाहिजे व त्यांत ३२ एकर २८ गुंठे जमीन मिळविली म्हणजे त्याच्या वहितींत ५० एकरांपेक्षा जास्त जमीन होते. ही तक्रार ता. २१–२–१९५२ च्या कलम ३६ (२) खाली काढलेल्या सरकारी पत्रक नं. ११०९–४९ वर आधारलेली आहे. कलम ३६ (२) मध्यें अशी तरतूद केली आहे कीं, स्वतःच्या वहितींत ५० एकर ठेवावयाची त्यांत भात जमीन किती, बागाईत जमीन किती व जिराईत किती ह्या मर्यादा सरकार पत्रक काढून प्रसिद्ध करील. सरकारी पत्रक खाली दिल्याप्रमाणें आहेः—

"मुंबईच्या १९४८ च्या कूळ कायद्याच्या कलम ३६ (२) खाली मिळालेल्या अधिकारान्वयें मुंबई राज्यसरकार असें जाहीर करतें कीं, कलम ३४ व ३६ मध्यें ५० पासून २०० एकरांची मर्यादा निश्चित करतांना बागाईत किंवा भातजमिनीच्या एक एकराबरोबर जिराईत ४ एकर जमीन समजली जाईल."

या पत्रकाच्या आधारावर अशी तक्रार करण्यांत येत आहे कीं, ११ एकर २९ गुंठे बागाईत जमिनीबरोबर ४६ एकरांपेक्षा जास्त जमीन जोड वहितींत आहे असें समजलें पाहिजे. प्रतिपक्षातर्फे अशी तक्रार करण्यांत येत आहे कीं, क. ३६ (२) खाली अशातऱ्हेचें पत्रक काढण्याचा सरकारला अधिकार नव्हता. तेव्हां हें पत्रक बेकायदेशीर आहे. कलम ३६ (२) खाली सरकारला फक्त ५० एकरांमध्यें कोणत्या प्रकारची किती किती एकर जमिन असावी एवढेंच ठरविण्याचा अधिकार आहे. म्हणजे ५० एकरांपैकीं इतके एकर बागाईत, इतके एकर भातशेती व इतके एकर जिराईत जमीन असावी असें ठरवितां येईल. परंतु एक एकर बागाईत जमिनीबरोबर चार एकर जिराईत जमीन समजली जाईल असें प्रमाण (Ratio) ठरविण्याचा सरकारला अधिकार नाहीं. निरनिराळ्या प्रकारच्या जमिनींमधील प्रमाण (Ratio) ठरविण्याचा सरकारला अधिकार नाहीं. विधिमंडळानें ५० एकर जमिनीची मर्यादा ठरवून दिली आहे. सरकारच्या पत्रकाप्रमाणें जमीनदाराजवळ पांच एकर बागाईत जमीन असेल त्याला फक्त ३५ एकरच जिराईत जमीन आपल्या वहितींत ठेवतां येईल. यावरून उघड होईल कीं, कलम ३४ मध्यें सांगितलेल्या जास्तींत जास्त मर्यादा सरकारनें आपल्या पत्रकानें कमी केली आहे. परंतु कायद्यानें घालून दिलेली मर्यादा आणखी कमी करण्याचा सरकारला कांहीं अधिकार नाहीं. ज्यांची बेरीज ५० एकर होईल अशा निरनिराळ्या प्रकारच्या जमिनी किती किती असाव्या हें सरकारला ठरवितां येईल. तेव्हां आमचें मत असें आहे कीं, सरकारचें ता. २१–२–१९५२ चें नं. ११०९–४९ चें पत्रक बेकायदेशीर आहे. तेव्हां जमिनदाराजवळ ५० एकर आहे किंवा नाहीं हें सरकारी पत्रकांत दिलेलें प्रमाण (Ratio) ध्यानांत घेतलें जाणार नाहीं. तेव्हां आमचें मत असें आहे कीं, जमिनदाराच्या वहितींत ५० एकरांपेक्षा कमी जमीन होती. म्हणून प्रांताधिकाऱ्याचा आदेश चुकीचा आहे. हेंहि स्पष्ट आहे कीं, दुरुस्त केलेल्या कलम ३४ मधील तरतुदी प्रस्तुत केसला लागू नाहींत. तेव्हां जमिनदाराजवळ शेती क्षेत्रापेक्षा जास्त जमीन आहे कीं नाहीं या प्रश्नाचा प्रांताधिकाऱ्यानें विचार करावयास नको होता.

४. कुळांचा तपासणी अर्ज काढून टाकण्यांत येत आहे. जमिनदाराचा अर्ज मंजूर करण्यांत येत आहे. जमिनदाराला सबंध शेत कबज्यांत मागण्याचा हक्क आहे. मामलेदार व प्रांताधिकाऱ्याचे अर्ज नष्ट करण्यांत येत आहेत. कुळांनीं सबंध शेतजमिनदाराच्या कबज्यांत द्यावें असा आम्हीं आदेश देतों.

### सारांश

जमिनदाराजवळ ५० एकरांपेक्षा जास्त जमीन ठेवतां येत

नाहीं. कलम ३६ (२) खाली यांपैकी जास्तींत जास्त किती एकर बागाईत असावी व किती एकर जिराईत असावी ही मर्यादा सरकारला ठरवितां येते. म्हणजे ५ एकर बागाईत व ४५ एकर जिराईत अशा मर्यादा घालतां येतात. या मर्यादा कशाहि ठरविल्या तरी त्यांची बेरीज ५० एकरापेक्षा कमी होतां उपयोगी नाहीं. पण सरकारला एक एकर बागाईत जमीन म्हणजे इतकी एकर जिराईत जमीन असें प्रमाण ठरविण्याचा अधिकार नाहीं कारण त्यामुळें त्यांची बेरीज ५० एकरांपेक्षा कमी होते.

### बँकांचीं वाढतीं कर्जें

बँकांनीं आपल्या जवळील ठेवींच्या ५० ते ५५% ज्यास्त प्रमाणांत कर्जें देणें धोक्याचें आहे, असें मत डॉ. जॉन मथाई ह्यांनीं व्यक्त केलें आहे. गेल्या कांहीं महिन्यांत बँकांकडील कर्जमागणी वाढली आहे, तिला उद्देशून त्यांनीं वरील उद्गार कॅनरा बँकेच्या सुवर्ण-महोत्सवप्रसंगीं मंगलोर येथें काढले. सरकारी व खाजगी विभागांतील खर्चापैकीं मोठा भाग मजुरीच्या रूपानें प्रसृत होतो, त्यामुळें ठेवींत व्हावी तशी वाढ होत नाहीं, असें ते म्हणाले.

### श्री. नी. आ. कल्याणी

दि. १७-१०-५६ चे "अर्थ" चे अंकांत सातारा जिल्हा को. लँड मॉर्गेज बँकेच्या माहितींत चेअरमनचें नांव चुकीचें पडलें आहे. त्या जागीं 'श्री. नीलकंठराव आण्णाप्पा कल्याणी' असें वाचावें.

### झोंप चांगली पाहिजे ना?

एका सुप्रसिद्ध व सनातनी पद्धतीच्या बँकेच्या चालकांनीं आपलें घोषवाक्य पुढीलप्रमाणें पसंत केलें होतें:—"१० टक्के व्याज मिळालें तर तुम्हांला कांहीं काळ अधिक चांगलें खातांपितां येईल. पण ३ टक्के व्याजानें अधिक चांगली झोंप लागेल."

### बिचारा कॅशिअर

तरुणी रागानें तणतणत बँकेच्या मॅनेजरच्या खोलींत शिरली व त्याला म्हणाली: "काय थट्टा चालविली आहे ही! माझा चेक 'इन्साफिशंट फंडस' म्हणून कॅशरनें परत काय म्हणून धाडला? मी माझ्या डोळ्यांनीं त्यांच्याजवळ हवे तेवढे पैसे असल्याचें पाहिलें आहे."

**अमेरिकेंतील भारतीय नागरिक**—सध्यां अमेरिकेंत ५०० भारतीय नागरिक रहात आहेत. कॅनडांतील भारतीय नागरिकांची संख्या ४,००० आहे. अमेरिकन गोलार्धांत असलेल्या इतर देशांपैकी सर्वांत अधिक भारतीय नागरिक ब्रिटिश गिआना ह्या देशांत आहेत. कोलंबिआ ह्या देशांत अवघे दोन आणि युक्वेडोर ह्या देशांत अवघा एक भारतीय नागरिक आहे.

**स्वित्झरलंडची मदत**—स्वित्झरलंडच्या सरकारनें संयुक्त-राष्ट्रांतर्फें इजिप्तमध्यें जाणाऱ्या सैनिकांना नेपल्सहून सुएझ कालवा विभागांत आपल्या विमानानें नेलें होतें. स्विस विमानांनीं ११ दिवस ही वाहतूक केली. वहातुकीचा खर्च स्वतःच सोसण्याचें स्विस सरकारनें ठरविलें आहे. शांतता रक्षणाच्या कामीं मदत करण्यासाठीं हा निर्णय घेण्यांत आला. स्वित्झरलंड संयुक्त राष्ट्रसंघाचे सभासद नाहीं.


## भोर स्टेट बँक लि.

[ स्थापना : १९४४ ]

**मुख्य कचेरी:—भोर, जि. पुणें.**

शाखा:—पुणें, पाली व शिरवळ.

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. ५,००,००० |
| खपलेलें भांडवल | रु. ५,००,००० |
| वसूल भांडवल | रु. २,५०,००० |
| गंगाजळी व इतर फंडस् | रु. ७७,००० |

**बोर्ड ऑफ डायरेक्टर्स**

श्री. म. व्यं. शिंगरे, अध्यक्ष. — न. भू. ना. पां. थोपटे, उपाध्यक्ष.
रावसाहेब य. दृ. खोले. — श्री. चं. रा. राठी.
श्री. गो. वा. देवी — श्री. बा. ग. धंडुके.

सरकारी रोखे खरेदी-विक्री, व्याजवसुली, पेन्शन कलेक्शन व इतर बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.
बँक १ ते ४ वर्षें मुदतीसाठीं कायम ठेवी स्वीकारते.
दराबाबत समक्ष चौकशी करावी.
पुणें कचेरी:—बुधवार घ. नं. ३६१-६२, पासोड्या विठोबानजीक. फोन नं. २५७६.
अधिक माहितीसाठीं लिहा.

वाय. एस. जोशी
मॅनेजर.

## दी भारत इंडस्ट्रिअल बँक लिमिटेड

हेड ऑफिस : पुणें शहर

शाखा:—पुणें लष्कर, बारामती, लोणावळा, श्रीरामपूर, ओझर (तांबट) जि. नाशिक, खोपोली जि. कुलाबा

श्री. के. पां. जोशी (अध्यक्ष) — श्री. का. म. महाजन (उपाध्यक्ष)

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. १५,४३,८१० |
| विक्री झालेलें भांडवल | रु. ७,९३,८१० |
| वसूल भांडवल | रु. ४,००,००० |
| रिझर्व्ह फंड व इतर रिझर्व्ह | रु. १,१४,००० |
| एकूण खेळतें भांडवल | रु. ६०,००,०००चे वर |

बँकेचे नवीन इमारतींत माफक भाड्यांत सेफ डिपॉझिट लॉकर्सची सोय केली आहे.

सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

श्री. रा. बा. साळवेकर B. A., LL. B.
श्री. नी. ना. क्षीरसागर } मॅनेजिंग डायरेक्टर्स


हें पत्र पुणें पेठ शिवाजीनगर घ. नं. ११५१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास' ८२१ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.